VOLUME - VIII, ISSUE - I - AUGUST - JANUARY 2019-20
GENIUS - ISSN 2279 - 0489 - IMPACT FACTOR - 6.631 (www.sjifactor.com)

# १५. हिमलाट

**डॉ. वैजयंती दिलीप पेशवे**
कमला नेहरू महाविद्यालय, नागपूर.

'साहित्य क्षितिजावरील एक तेजस्वी तारा', 'मानवतेचे कवी', 'अग्निसंप्रदायाचे प्रवर्तक असा कुसुमाग्रजांचा गौरवाने उल्लेख केला जातो. कुसुमाग्रजांनी विविधांगी लेखन केले असले तरी मराठी माणसाच्या हृदयसिंहासनावर त्यांना स्थान मिळाले ते कवी कुसुमाग्रज आणि नाटककार शिवरवाडकर म्हणूनच ! कुसुमाग्रजांचे बारा कविता संग्रह प्रसिद्ध आहेत. एकापेक्षा एक सरस कविता त्यांनी लिहिल्या आहेत. मराठी कवितेला विशिष्ट वळण लावण्यात त्यांच्या कवितेचा फार मोठा वाटा आहे. कवी जेव्हा काव्यनिर्मिती करतो त्यावेळी आपल्या प्रतिभासामर्थ्याने तो अनेक काल्पनिक गोष्टी गोचर करीत असतो. काव्यरूपी यानात बसवून तो रसिकाला चमत्कृतीजन्य, स्वप्नांच्या अनाकलनीय प्रदेशात घेऊन जातो आणि रसिकालाही हेच हवे असते. पण यालाही एक मर्यादा असते. नुसतेच स्वप्नरंजन असण्यापेक्षा वास्तवाचेही भान कवीला असावे आणि याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे कवी कुसुमाग्रज होय. अंतराळातील भौगोलिक सत्याला कल्पनेचे कोंदण देऊन 'पृथ्वीचे प्रेमगीत' ही अमर कविता ज्या ताकदीने लिहितात त्याच ताकदीने सामाजिक विषमता भेदकपणे दर्शविणारी 'हिमलाट' ही कविताही लिहितात.

कुसुमाग्रज साहित्य आणि सामाजिकता यांचा संबंध मानतात. साहित्याने समाजातील दुर्बल घटकांची जाणीव ठेवायला पाहिजे असे त्यांचे मत आहे. कुसुमाग्रजांच्या कवितेचे वैशिष्ट्य हे की, 'त्यांची कविता आत्ममग्न असण्यापेक्षा भोवतालच्या सामाजिक, राष्ट्रीय सुखदु:खाशी ती एकरूप झालेली दिसते. बरेचदा आपल्या कवितेतून कुसुमाग्रह समूहाचा प्रतिनिधी बनून बोलताना दिसतात.'[१] कारण समाजातील माणसांची होत असलेली गांजवणूक, पिळवणूक त्याच्यावर होणाऱ्या अन्यायामुळे कुसुमाग्रज अस्वस्थ होतात आणि त्यातूनच त्यांच्या अनुभवांना उदार रूप मिळते. कलावंताने फक्त मनोरंजन करावे हे कुसुमाग्रजांना मान्य नाही. तर कलावंताच्या अनुभवाच्या प्रदेशात कोणत्याही सरहद्दी असण्याचे कारण नाही असे ते मानतात. लेखकाच्या/कवीच्या भावकोशात सामाजिकता कशी येते याची प्रक्रियाही ते समजावून सांगतात. 'परिसरातील परिस्थितीने नानाविध संस्कार लेखकाच्या व्यक्तिमत्वावर होत असतात व त्या क्रिया—प्रतिक्रियांतून त्याला विशिष्ट आकर, विशिष्ट रंग प्राप्त होतो. या बाह्य संस्कारामुळेच व्यक्तीच्या भावकोशात प्रविष्ट झालेली सामाजिकता वाङ्मयरूप धारण करते.'[२] म्हणजेच साहित्यात येणारी सामाजिकता ही बाहेरून येत नसते, ती लादलीही जात नाही तर ती लेखकाच्या पिंडातच असते. मानवी जीवनमूल्ये, त्या मूल्यांची जपणूक त्यांच्यातील सच्चेपणा याचा ध्यास कुसुमाग्रजांच्या कविमनाला लागलेला आहे. त्यांची कविता माणसातील माणूसपण जपताना दिसते. माणसातील शिवत्व, सुंदरत्व आणि सत्यता शोधण्याचा प्रयत्न त्यांची कविता